लातूर जिल्हा नियोजन समितीवर विशेष निमंत्रित नियुक्तीबाबत.

महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग,
शासन निर्णय, क्रमांक: डिएपी-२०१९/प्र.क्र. १८ /का-१४८१अ,
मंत्रालय, मुंबई-४०००३२
दिनांक : ३ जून, २०१९

पहा:- १) महाराष्ट्र जिल्हा नियोजन समिती (रचना व कामे) अधिनियम,१९९८
२) महाराष्ट्र जिल्हा नियोजन समिती (रचना व कामे) (सुधारणा) अधिनियम, २०००
३) शासन निर्णय क्र. डिएपी १०१७/प्र.क्र.१३/का.१४८१, दि.८.३.२०१७
४) जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, लातूर यांचे पत्र क्र.जिनिस/ सदस्य नियुक्ती/का.१/१३९, दि.२१/१/२०१९.

शासन निर्णय :-

"महाराष्ट्र जिल्हा नियोजन समिती (रचना व कामे) (सुधारणा) अधिनियम, क्रमांक ३०/२०००" मधील कलम ३ चा पोटकलम (३)(चार) (फ) येथील तरतुदीनुसार संदर्भांकित शासन निर्णय क्र.डिएपी १०१७/प्र.क्र.१३/का.१४८१, दि.८/३/२०१७ अन्वये ११ विशेष निमंत्रितांची लातूर जिल्हा नियोजन समितीवर नियुक्ती करण्यात आली होती. त्यापैकी श्री.नवनाथ गणपतराव भोसले यांच्याऐवजी श्री. सतीश रावसाहेब आंबेकर यांची विशेष निमंत्रित म्हणून नियुक्ती करण्याची शिफारस, मा. पालकमंत्री, लातूर यांनी केल्यानुसार श्री.आंबेकर यांची "विशेष निमंत्रित" म्हणून लातूर जिल्हयाच्या जिल्हा नियोजन समितीवर नियुक्ती करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	विशेष निमंत्रितांचे नाव	पत्ता
१	श्री.सतीश रावसाहेब आंबेकर	रा.नटवरवाडी, ता.रेणापूर, जि.लातूर

२. जिल्हाधिकारी व सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, लातूर यांनी उपरोक्त आदेश सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणावेत.

३. जिल्हा नियोजन समिती लातूर या समितीवर, वर नमूद **"विशेष निमंत्रित"** यांची नियुक्ती शासनाचे पुढील आदेश होईपर्यंत किंवा त्यांची नियुक्ती रद्द होईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल, तोपर्यंत अबाधित राहील.

४. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक संकेतांक २०१९०६०४१७०५१६०८१६ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने

VIJESING FATTESING VASAVE

Digitally signed by VIJESING FATTESING VASAVE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PLANNING DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=5494d2ad3a3bc5ddd66daf9a8f17ceec5e2d7d4b6a8bba99c51d275801bcdf1b, cn=VIJESING FATTESING VASAVE
Date: 2019.06.04 17:11:42 +05'30'

(वि. फ. वसावे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव,
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,
३. मा. मंत्री (नियोजन) यांचे खाजगी सचिव,
४. मा. राज्यमंत्री (नियोजन) यांचे खाजगी सचिव
५. मा. पालकमंत्री तथा अध्यक्ष, जिल्हा नियोजन समिती,लातूर यांचे खाजगी सचिव

६. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन
७. विभागीय आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद.
८. जिल्हाधिकारी व सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, लातूर.
९. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर
१०. उपआयुक्त (नियोजन), विभागीय आयुक्तांचे कार्यालय, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद
११. जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय,लातूर.
१२. निवडनस्ती, का-१४८१ अ, नियोजन विभाग.